# खजुरी

अरविंद राऊत



म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५८०
REFBK-0025681
REFBK-0025681

# खजुरी

[ कविता संग्रह ]

: कवी :

चालनाकार अरविन्द राऊत,

साहित्यप्राज्ञ

REFBK-0025681
REFBK-0025681

१९३३ — १९८७

**प्रकाशक :**

किरण अरविन्द राऊत
चाल्ना – कार्यालय,
काशीनाथ धुरु मार्ग, दादर–मुंबई–२८.

© प्रकाशक :

**प्रथमावृत्ती प्रसिद्धीकाल :**

दि. ५ सप्टेंबर १९८७, शिक्षकदिन.

**मूल्य :** १५ रुपये

**मुद्रक :**

जयराम ह. सावे
स्वाती प्रिंटर्स, शिवाजी मंदिर, दादर, मुंबई–२८.

**मुखपृष्ठ चित्रकार :**

शरदचंद्र लि. पाटकर
ज्येष्ठाराम बाग, डी/२, खोदादाद सर्कल,
दादर, मुंबई १४.

लहानपणी एकत्र वाढलो - खेळलो

आणि जिने

आयुष्याच्या अखेरपर्यंत

माझ्यावर निर्व्याज प्रेम केले

ती माझी समवयस्क बहीणतुल्य मावशी

**कबू** ( वरोर )

हिच्या अविस्मरणीय स्मृतीस—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८०
दा. २५६८९
काव्य
२७।८।८८

# खजुरीच्या बुडाशी—

लहानपणापासून मला वाचनाचा छंद आहे. विद्यार्थी वयात वरोर येथे मी एक वाचनालय स्थापन केले होते. त्याचे स्वरूप बदलत बदलून आजही ते तेथे चालू आहे. माझे मित्र ॲड्. लक्ष्मण पाटील हे त्याची जीव तोडून काळजी वाहतात. नरपड येथेही एक वाचनालय होते. काही काळ त्याची व्यवस्था मी पाहिली. पुढे ते नष्ट झाले. या दोन्ही वाचनालयातील जवळ जवळ सर्व पुस्तके मी वाचली त्यामुळे वाचनाची माझी तशी आबाळ झाली नाही. मनोरंजन, नवयुग, महाराष्ट्र साहित्य अशा त्या काळी प्रसिद्ध असलेल्या मासिकांच्या जुन्या बांधीव अंकातील केशवसुत, तांबे, गिरीश, बालकवी, माधवज्युलियन, मायदेव, यशवंत इत्यादी कवींच्या कविता मी चवीने वाचल्या. काहींचे काव्यसंग्रहही वाचले. गोविंदाग्रजांची ' वाग्वैय जयंती ' अनेक वेळा वाचली. कविता वाचनाची व ऐकण्याची आवड अद्याप टिकून आहे. या सर्वांचा परिणाम वयाच्या १५ व्या वर्षापासून मी प्रसंगानुरुप कविता करू लागलो.

आता पर्यंतच्या आयुष्यात काही कविता लेखन झाले. अमरलेखा (पुणे), चालना या मासिकाचा मी संपादक असल्यामुळे त्यात काही कविता प्रसिद्ध झाल्या. काही बकुल, राजग, माकंद या टोपण नावांनीही प्रसिद्ध झाल्या. या कवितांपैकी निवडक कविता पुस्तकरुपाने प्रसिद्ध कराव्या असे काही वर्षे मनात येई पण कृतीला मन तयार होत नसे. कारण माझ्या उणिवा मला माहीत आहेत. अखेर घरातील मंडळीच्या आग्रहाखातर आता जीवनाच्या संध्याकाळी कवितासंग्रह काढण्याचा विचार नक्की केला.

प्रथम वाटे प्रेम, बाल, शिक्षण, व्यक्ती, समाज असे विभाग पाडावेत, कोणा कवी मित्राकडून संपादन (एडीट) करून घ्यावे, कुणाचे अभिप्राय घ्यावेत, प्रस्तावना घ्यावी पण हे सर्व मनातून काढून टाकले आणि कविता केल्याच्या कालानुक्रमाने त्या घेतल्या. ज्या काळी कविता जशी होती तशीच ठेवली. फक्त शुद्धलेखन नव्याप्रमाणे बदलले. स्थळांचाही उल्लेख ठेवला आहे. कवितातील दोष, दुर्बोधता आजही मला दिसते पण त्यातही दुरुस्ती केली नाही. अभ्यासू व जिज्ञासू रसिकांनी ते दोष अवश्य शोधावेत आणि या कवितात काही आशय वा रस आढळला तर अवश्य घ्यावा. माझा जन्म दिनांक ७ जून १९१५ आहे. या वरून माझ्या कोणत्या वयोमानातील कविता आहेत व पुढे पुढे कवितात काही फरक पडला का हेही पाहाण्याचे मी वाचकांवरच सोपवितो. माझ्या संबंधित काही व्यक्ती, माझ्या संस्था व माझा ध्येयवाद या बद्दलच्या प्रेमभावनांचा आविष्कार या कवितात यथामती उमटलेला आढळेल.

हल्ली साहित्यात कवितेचे स्वरुप बदलले आहे. अक्षर, गण, मात्रांनी मर्यादित अशा वृत्त-जाति छंदात हल्ली कविता कुणी करीत नाहीत. पण माझ्या बऱ्याच कविता तशा आहेत. काही कविता गेय आहेत. गोविंदाग्रजा सारख्या श्रेष्ठ कवीच्या पदरजाशीही माझी तुलना होणार नाही तरीपण या संग्रहावर 'वाग्वैय जयंती' ची ओझरती तरी सावली पडली आहे हे जाणकारांना दिसून येईल

'खजुरीची खळबळ' ही चालनेच्या एका दिवाळी अंकात प्रसिध्द झालेली माझी कविता अनेकांना आवडली. तशी पत्रे आली मुंबईतील खोताच्या वाडीतील एक संस्कृततज्ञ ज्येष्ठ रसिक पं. वि. शंकरराव चौधरी यांचे पत्र उत्तेजक होते. म्हणून या कवितासंग्रहाला 'खजुरी' असे नाव मी दिले.

डहाणू ते दमण–नगरहवेली या भागात खजुरींची असंख्य झाडे आहेत. ती दडल्या ( सोलणे ) वर फार सुंदर दिसतात. या झाडांचे बहुविध उपयोग आहेत. शेतकऱ्यांना उत्पन्न देणारी ही झाडे आहेत. आमच्याही शेतात ती आहेत. या पुस्तकाला ' खजुरी ' नाव देऊन मी या झाडाबद्दलची कृतज्ञता व रसिकताच दाखविली आहे.

या कवितासंग्रहाचे स्वागत कोणी कसेही करो. निदान माझी नातवंडे – कादंबरी, तुषार, अदिती, तेजल, प्रियांका व मेघदूत – मोठी झाल्यावर आपले भाई ( आजोबा ) केवळ लेखक व संपादक नव्हते तर मोडक्यातोडक्या कविता करणारे कवीही होते एवढे त्यांना कळले तरी हे पुस्तक प्रसिद्ध झाल्याचे सार्थक होईल-

माझे मित्र व स्वाती प्रिंटर्सचे मालक श्री. जयराम सावे यांनी आपुलकीने, सवलतीने व सुंदर छपाई करून देण्यात आनंद मानला. त्यांच्या कामगार मित्रांनीही माझ्यावर लोभ दाखवला. माझ्या हाकेला दीर्घकाल 'ओ' देणारे माझे मित्र, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार श्री. हरीश राऊत यांच्या मार्गदर्शनाने चित्रकार श्री. शरदचंद्र पाटकर यांनी अल्पावधीत व वक्तशीरपणे पुस्तकाचे मुखपृष्ठ चित्र काढून दिले. या सहाय्य करणाऱ्या सर्व मित्रांना मनापासून धन्यवाद !

ठाकूर बिल्डिंग,
काशिनाथ धुरु मार्ग,
दादर, मुंबई–२८.
दि. १५ ऑगस्ट १९८७

— अरविन्द राऊत

# कविता – पानानुक्रम


१. नमस्कार त्या राजमातोश्रियेला ७
२. करुण पंचक ८
३. धर्मवीर संभाजी महाराज ९
४. शेतकऱ्यांची निराशा ११
५. बकुलाश्रम १३
६. संध्या निरीक्षण १३
७. झोपलेल्या मित्रास १४
८. बाल भावना १५
९. अंतर्पाट १६
१०. प्रीती १६
११. भावी वधूस १७
१२. तुझे बोल १८
१३. — स १९
१४. भिजत चाललेल्या तरुणीस २१
१५. आमची बाग २२
१६. केळवे २३
१७. विवाह प्रित्यर्थ २४
१८. थोर माझी माय ग २५
१९. ती सीमोल्लंघने गेली २६
२०. माझी मनी २७
२१. जि. हेमलतचा पाळणा २८
२२. चि. हेमलतेस ३०
२३. स्वर्गस्थ हेमलतेस ३०
७४. वयस्क विद्यार्थी मित्रास ३१
२५. हिटलर नाहि कुठे ? ३२
२६. धन्य गुरुजी ३४
२७. फुलांची शाळा ३५
२८. दुष्काळग्रस्त अबला ३६
२९. गुरे चारताना ३७
३०. पुनर्भेट ३८
३१. वनवासी शिक्षक ३९
३२. चल ऊठ ४०
३३. संपावर चाललेल्या शिक्षकास ४१
३४. सेवा फकिरास ४२
३५. वारली वरनोवरी ४३
३६. सत्कार सुमनांजली ४५
३७. जीवन साफल्य ४६
३८. उगीच का जीवघात ४८
३९. जग स्मरेल तुजला एकदिनी ४९
४०. चल पुढे ५०
४१. मीराबाई ५१
४२. समाजसुंदरीस ५३
४३. पंचवर्षीय चालनेस ५४
४४. कर माझे जुळती ५५
४५. एव्हरेस्टचे आव्हान ५६
४६. माझा महाराष्ट्र आला ५९
४७. द्वादश वर्षीय चालनेस ६०
४८. भाई नच अमुचे गेले ६१
४९. सीमापार ६२
५०. देवलोकी ६३
५१. टा ऽ टा ऽ ६३
५२. हाय अश्वत्थ वृक्ष उन्मळला ६४
५३. उद्याचा जन्म ६६
५४. खजुरीची खळबळ ६७
५५. नागवेलीचे मनोगत ७०
५६. तू भुताळी ७२
५७. आम्हाला देव का हवा ? ७३
५८. हटाव-बचाव ७४
५९. हवे-नको ७४
६०. हे मृत्यो ७५

मराठी ग्रंथ संग्रहालय
२५८०
काव्य

# नमस्कार त्या राजमातोश्रियेला !

(वृत्त – भुजंगप्रयात)

जिये ऊदरी जन्मला शीवराणा। प्रतापे जहाला महाराष्ट्र राणा ॥
खरा देह वाहीयला लोक काजा। नमस्कार त्या श्रीजिजाईस माझा ॥

प्रती अंजनी की प्रती देवकी ती। विरा जन्म देई जगी माउली ती ॥
जगी वानिती लोक प्रेमें जियेला। नमस्कार त्या राष्ट्रमातोश्रियेला ॥

खरी वीरमाता खरी वीरकांता। खरी वीरस्नूषा खरी वीरसूता ॥
खरी भूषणा जाहली दो कुळीला। नमस्कार त्या हींदभूच्या सुतेला ॥

जिये हाती दोरी असे पाळण्याची। जगाते खरी उद्धरी; वाणि साची ॥
करूनी जिने दाविली भूवनीला। नमस्कार त्या आर्य-मातोश्रियेला ॥

धरी मानसी हेत घेण्या गडाते। खरा वीर तीचा पुरी कामनेते ॥
अशा मातृभक्ता जिये जन्म दीला। जगी पात्र ती वंदण्या या कवीला ॥

जधी शीवराया निघे राज–कामे। तये वेळी वंदी तिते पूर्णकामे ॥
जियेच्या कृपेने यशोप्राप्ति होते। नमस्कार माझा तया शीव–माते ॥

जयी यावने ग्रासिले माह–राष्ट्रा। तयी मा-रूपे जन्म घे क्षात्र-गोत्रा ॥
अणी जन्म देवोनि श्रीशिवभूते। करी मूक्त ती मंगला माय–भूते ॥

पुन्हा मागुती जन्म घे देवि आता। करी वीर नीष्पन्न जो हींद–त्राता ॥
जियेची जरूरी असे भारताला। नमस्कार त्या राजमातोश्रियेला ॥

झारली, दि. ५–३--१९३३

# करुण-पंचक

( वृत्त – स्वागता )

( त्यावेळी आजच्या सारखा मी ' नास्तिक ' नव्हतो. त्यामुळे पुढील काही कवितात ' देव ' डोकावेल. बेकार होतो. कोठे नोकरी मिळत नव्हती. घरची अत्यंत गरिबी. जीवनात वैफल्य येऊ पाहात होते. अशा वेळी संत रामदासांचे 'करुणाष्टक ' वाचून ही कविता स्फुरली. )

या जगी बहुतताप जहाला । आसरा तुजविणे कवणाला ॥
षड्रिपू कधि न देति विसावा । दाखवी चरण देवधिदेवा ॥

नांदते अनिति या जगतात । त्रासही बहुत हो जगतात ॥
मी असे शरण तो प्रभु पाही । दाखवी चरण ते लवलाही ॥

मायबाप तनया निजदारा । मायेचा दिसत हाचि पसारा ॥
यातुनि करि धरी मज रामा । काढि तू भवहरा नवरा–मा ॥

जल्पना अजिवरी बहु केली । रामपादपयपानि भुकेली ॥
राघवा सुमति दे मज दीना । जेवि देह द्युमणी कर दीना ॥

श्रीधरा रघुविरा भवहारा । सुंदरा प्रभुवरा मन–हारा ॥
दे गती मज भवी तरण्यास । सर्व सोडुनि तुझी धरि आस ॥

झारली, दि. २०–३–१९३३

( ' झारली ' हे नरपडच्या पूर्वेस सुमारे ६ / ७ कि. मी. वर डोंगराच्या पायथ्याशी वसलेले निसर्गरम्य वारली–आदिवासी खेडे. येथे माझे वडील खंडाने वाडी करीत. वरोरचे आजोळ सोडून मी येथे राहायला आलो होतो. )

# धर्मवीर संभाजी महाराज

नऊ वर्षे दाद न दिधली । मोंगला जयाने होती ॥
श्रीशीवभूचे पश्चात । हींदभूमि झळकत होती ॥
किति खानसाब तडफडले । तरी जो नहि जेरीस आला ॥
परि अवनतिचा आला घाला । धर्मवीर जगती झाला ॥
तो शिवरायाचा सूत ।
शत्रूचा करी निःपात ।
हींदभूचा प्यारापूत ।
दावूनि पाणी यवनाला । कीर्तिवंत जगती झाला ॥१॥

बेसावध असता सिंह । जाळ्यात पकडवा जैसा ॥
की शार्दुल असता मंद । मारावा बहुते जैसा ॥
की तोयी पडला सर्प । मूषके करावा घोडा ॥
की महाविराचे पायी । दैवानं पडावा खोडा ॥
संगमी राहि बेफिकीर ।
तो करी घात झुल्फिकीर ।
वेढीत सैन्य चौफेर ।
स्वाधीन तयाते झाला । परि लेशहि नाही डगला ॥२॥

तो यवनेश्वर त्या वदला । घे दीक्षा मम धर्माची ॥
सोडोनि तुजला देतो । नच फिकीर तुज प्राणाची ॥
राज्यही तुझे तुज देतो । नच चिंता तुज जाण्याची ॥
मम अमान्य करीशी बोला । तरी जिव्हा छेदीन तुमची ॥
ते वीर्य शीवरायाचे ।
ते धैर्य महाराष्ट्राचे ।
ते क्रौर्य यवन–दैत्याचे ।
परी धीरनिधि तो कसला । तिळभरही नाही भ्याला ॥३॥

अबलांना नित्य छळताती । त्या धर्मी कैसा जाऊ ॥
हिंसा असूया जै वसती । त्या धर्मी कैसा जाऊ ॥
बेचिराख करिती देशा । त्या धर्मी कैसा साहू ॥
जरि दावी डर वधण्याचा । तरि वाटत नाही बाऊ ॥

अभिमान हिंदु धर्माचा ।
अभिमान माय देशाचा ।
अभिमान क्षात्र-तेजाचा ।
सोडू कसा मी वदला । त्या क्रूर दैत्यराजाला ॥४॥

झारली, दि. २४।३।१९३३

# शेतकऱ्यांची निराशा

( साकी )

( दि. १६ मे १९३३ रोजी पडलेल्या अवेळी पावसामुळे शेतकऱ्यांची झालेली स्थिती पाहून – आजच्या शेतकऱ्याला खूप सुविधा प्राप्त झाल्या आहेत )

वसंत ऋतुच्या झाडांना ती पर्णें फुटली ना हो ।
ग्रिष्म ऋतूचें दीन तोच हें दिसू लागले का हो ॥

उकलेना हे कोडे प्रभुचे अती दीसते गूढ ।
अगाध महिमा ! परमेशाचा कसें जाणतील मूढ ॥

× × ×

झाली नाही शेतकऱ्यांची कार्यें राबादिक ती ।
हाय ! हाय ! परि गृहामधी ती भार्यासुतदिक करिती ॥

कसे नीभतील दिवस पूढचे कशी राहतील बाळे ।
गरिब बिचाऱ्या शेतकऱ्यांना चिंता लाविली काळे ॥

खाया नाही पोटी तशीहि फाटी तीही भिजली ।
आबळ झाली गरीब जनाचि उफराटी गति आली ॥

आस होति अंतरी तयांच्या पर्जन्या ऊबण्याची ।
परि परमेशा दया कशी ती आली नाही त्यांची ॥

एक सारखी चार दिवस ती वृष्टी झाली अवनी ।
आस जाऊनी सर्वहि त्यांची मुखे उतरली सदनी ॥

बीन राबाच्या शेतामध्ये जरी पेरणी केली ।
जोम कसा तो येईल त्यांना सांगा हो लवलाही ॥

या बीचारे शेतकरी ते बसले पहा गेही ।
' काय करावे ' मंत्र जपाविण काय करावे त्याही ।।

ना सूचेना धंदा त्यांना सर्वही दिसते अंध ।
हासतील त्या गरीब जनाना असतिल ते मतिमंद ।।

हे परमेशा सुधावृष्टि तुझी वीषयुक्त का केली ।
मूखचंद्रे ती तुझ्या सुतांचि होरपळूनी गेली ।।

धाव श्रीहरी ! दीन दयाळा ! ! मेघांच्याही देवा ! ! ।
थोडे दिन ही वृष्टि बंद कर निजसुत करिती सेवा ।।

हीन-दीन त्री शेतकऱ्यांची स्थिति पाहुनी हाय ।
बकुल कवीला कवन गावया स्फूर्ती दे प्रभुराय ।।

नरपड, दि. २० मे १९३३

## बकुलाश्रम

( माझे मित्र श्री. द. ह. सावे व मी ज्या ज्या गावी राहायला गेलो तेथील निवासस्थानास आम्ही ' आश्रम ' म्हणत असू. श्री. सावे वरोर येथे ज्या घरात राहात त्यास आम्ही ' बकुलाश्रम ' असे नाव दिले होते. या आश्रमाच्या दरवाजा-वर लावण्यासाठी केलेली ही कविता )

ज्याच्या मंगल मानसी निशिदिनी श्रीशारदेची प्रिती
सद्भावे बनुनी उपासक तिचा हीता-परा साधिती
अन् काया-वच-मानसे करूनिया सात्त्वीक वृत्ती असे
त्या येण्या बकुलाश्रमी बुध-जना द्वी-भाव येथे नसे

वरोर, दि. १२-९-१९३३

## संध्या निरीक्षण

अंगावरि पसरुनी जणु लाल शाले ।
श्रीमित्रबींब अर्धे क्षितिजी रिघाले ।
रत्नाकरावरि विराजत रम्य रश्मी ।
आरक्त पश्चिम दिशा तयि लक्षिली मी ॥

बोर्डी, दि. २८-१२-१९३४

# झोपलेल्या मित्रास

( श्री. द. ह. सावे यांना उद्देशून )

अहा मित्राप्रीया, किति तरि अजूनी तु निजशी
कधी पासूनी मी बसुनि तुझियापाशि बघशी
कशी रे निद्रा ही भुलुनि तुजला गुंग करिते
जगामध्ये कोणी नसति तिजला का न कळते ॥

अहा सखया प्रीया, झडकरी करी दूर सखितं
जगी हीच्या मोहा पडति नर कोणी न सुखिते
किती ही पापीणी अलसनगरी पोचवी नरा
निमे आयुष्याचा उडवि फडशा हीच असुरा ॥

प्रिया गांधीजी वा नरपति मराठा श्रीशिवजी
न झाले निद्रेला वश बहु तुम्हासारखे अजी
तयांची सत्कीर्ति स्मरूनि उठरे वा झडकरी
उभयता ध्येयाने धरूनि करू या दूर सफरी ॥

वरोर, दि. २४-३-३४

## बाल-भावना

बाल सान खेळता बीदीमाजी
पाखराते पाहोनि होय राजी
हात अपुले चिमुकले उभारूनी
सवें त्यांच्या विहरावें येइ ध्यानी ॥

परी ओठावर बोट ठेवुनीया
का न उडता येई ही करी चिंता
तोच घर्ऽऽ गगनात नाद होई
बाल तिकडे दचकून लक्ष लावी ॥

विमानाते देखोनि असा काय
बालहृदयी उमटूनि ठसा जाय
सहज लीलेने त्यास हसू येई
तोच आई उचलोनि कडे घेई ॥

बोर्डी, दि. ३१-१२-१९३४

## अंतर्पाट

( आमच्यावेळी लग्नापूर्वी वधूला ( दूरच्या गावची असेल तर ) पाहिलेली नसे. लग्नाच्यावेळी वधूवरात अंतर्पाट ( पडदा ) धरतात. यावेळची वराची मनःस्थिती. )

येते वेळ कधी ' विवाह ' करण्या ही आस होती मनी
आनंदे दिन हा अजी उगवला होण्यास तू कामिनी
मूखेंदू बघण्या सखे, प्रियतमे हा जीव होतो वरी
अंतर्पाट तुझ्यामधि धरियला का सांग गे सुंदरी

नरपड, दि. १-१-१९३५

## प्रीती

कोणी धरी स्वहृदयी निजकामिनीते
कोणी धरी कवळुनी निज वासराते
वेली तरूस चिकटूनि अखंड राही
येथे प्रिती द्विहृदयांतरी व्यक्त होई

नरपड, दि. १-१-१९३५

## भावी वधूस—

(त्या काळी आमच्या समाजात वरपक्षान लग्नाच्या वेळी वधूच्या अंगावर किमान ५ तोळे सोन्याचे दागिने घातलेच पाहिजेत अशी वधूपक्षाची अट असे. आम्ही तर गरीब आणि सोन्याचा भाव एवढा वाढला की, तोळ्याला ३५ रु. झाले, (आता २,६०० रु. तोळा आहे.) अशा स्थितीत माझे लग्न होणे कठीण होते. म्हणून अज्ञात भावी वधूला उद्देशून)

करा दागिने तू विविध म्हणशी भावि सखये
जरी थोडे केले तरी न वरणे ही अट असे
असेही सोन्याला विपुल अगदी भाव सुभगे
करावे मी कैसे अनुकुल स्थिति नाहि अजि गे ॥

किती या रूढीने अजिवरी गमावूनि सुथळा
अभागी त्या बाला पडति पदरी शेवटी खळा
करी या विचारा गरिब मम भावी पति असे
तसा सोन्याला तो अजि बहुतची भावहि असे ॥

विशुद्ध प्रेमाची सर कधी नये गे स्व–भुषणी
समंजोनी सोडी ‘ स्वयंवर ’ पणा या नव झणी
सती दमयंती वा भिमककुमरी या प्रियकरा
वरीले प्रेमाने; न कधी भुलल्या त्या चमिकरा ॥

जरी तुझ्या इच्छेस्तव ऋण करूनी मि भुषणे
करूनी दावीली तरि ति अपणा झीज सजणे
अशा सन्देशाते स्मरुनि भुषणा फार न तु घे
सखे माझ्याशी तू वरूनि हरुषे भोगी सुखगे ॥

नरपड, दि. ३ मार्च १९३५

# तुझे बोल

( चाल – राधेकृष्ण बोल. )

प्रीय रमणि बोल । मुखसे । प्रेमशब्द बोल ।
तूझा शब्द तो । अमोल । रमणी प्रेमशब्द बोल ।। धृ ।।

प्राण देई मानव जीवा ।
प्रणयींचा प्राण विसावा ।
वाटते नित्य जइ गावा ।
नाही ज्यास मोल ।। तूझा. ।।

पडत्या सूर्या ठेवी स्थीर ।
दूनयेते दे आधार ।
करी प्रेमिजना अधीर ।
ऐसा ज्याचा डोल ।। तूझा. ।।

नेत्रशराने करी विकळ ।
मधुर शब्दे करी शीतळ ।
मधुपाते जेवि कमळ ।
तेवि ठेवी लोल ।। तूझा. ।।

पर्वतशी संकट होत ।
जरि विरहानलाने जळत ।
तरि करी दुःखी जना शांत ।
कानी पडता बोल ।। तूझा. ।।

अर्भकास जीवन दुग्धे ।
तेवी बोल तूझे मुग्धे ।
अनुसक्ता वाटती वरदे ।
घाली ज्यासि लोळ ।। तूझा. ।।

पाहे चातका मेघांबूची ।
आणि चकोरा रजनिपतीची ।
तेवि प्रणयि प्रिय रमणीची ।
वाट पाहे खोल ।। तूझा. ।।

नरपड, दि. ७ जून १९३५

## — स

( प्रियेच्या अंबाड्यातील गुलाबाचे फूल पाहून– )

( शार्दूलविक्रीडित )

तुझ्या त्या रमणीय सूंदर अशा केशोकलापावरी
शोभे त्या रमणी गुलाब कुसुमा पाहूनि मी अंतरी
झालो मूढ परि; तया कृतिमधी गूढ्यर्थ की वाटला
तो जाणे विधिही गमे मज उणा कैसें कळावे मला ॥

वाटे मत्सखिने स्व मूख कुसुमी जैसी कृति होतसे
मागेही दिसण्यास मत्पतिकृती या भावनेने असे
घेती बोध चतूर ते रसिकही या एक दृश्यावरी
की सूर्याकरसी–सुधावल अशी सत्कीर्ति मागे बरी ॥

जैसा मी सखये तुते करि धरी आलींगिण्या सौरसे
तैसे हे मृदुपुष्प देठकवची राहे पहा राजसे
आलिंगता तुझशी गडे तनुवरी रोमांच ऊभारती
तैसे या फुलपृष्ठी गे अणुसमा ते काहिंसे दीसती ॥

घेई मी भृगुसा तुझ्या अधरिची चूम्बूनि ती माधुरी
ओलावा दिसतो तसाचि सुमना आहे पहा सूंदरी
घेता चुंबन राजिवे मृदुलगे जेवी दिसे लाडके !
तेवी लालि तजेलता तनुवरी पुष्पाचिया दीसते ॥

माधुर्ये रसयुक्त वैखरि तुझी ‘ मूकं करोती ’ अशी
राहे ती मुखइंदु तो फुगिरता येई पहा गालसी
तेवी प्राणसखे कशा मृदुलशा दावीत ह्या पाकळ्या
की वाटे जणु त्या प्रियासि वदण्या तोंडा असे वासिल्या ॥

पुष्पाच्यामधि जे जरा चिकटसे - पाहूनि त्या केसरा
वाटे यौवन-वेलिचा-बहर तो लूटीयला साजिरा
आहे वास फुलां तसा तुजसिही आहे परी गुप्त तो
ज्याला रोग असे तुझ्या प्रिति-सुखा त्यालाच तो लाभतो ॥

होई वीस्मृति संस्कृती उपरती माझे सये मंगले
अंबाड्यावरती तुझ्या बघूनिया फूलास की प्रेमले
राहे चीत्त घडीभरी विहरते आशा-तरंगी परी
ऐसे पुष्प तुझ्या शिरी सततते पाहीन मी सुंदरी ॥

नरफड, दि. १५-६-१९३५

# भिजत चाललेल्या तरुणीस -

( आवणीच्यावेळी शेतातून आणि चिखलातून भिजत पुढे चाललेल्या तरुणीस पाहून – )

धड धडा किति पाऊस येतसे
झळझळा किति वातहि येतसे
समयि या तरुणी अणि सुंदरी
जातसे भिजत नीज गृहापरी

नभि जशी चपला झणि तळपते
तइ दिसे चलता तल–पाद ते
पद सरेल कधी म्हणुनी गमे
गजगती चलते बहुतश्रमे

भिजियले वरि पातळ वस्त्रते
थबथबा गळते परी धार ते
घडित सावरि ऊर स्थळावरी
पदर नाजुक गोंडस त्या करी ॥

सतत तो रमतो पवनासवे
पदर तो न रमे अजि त्यासवे
चिकटुनी तनुशी अजि बैसला
जणु प्रभूचरणी लीन जाहला

नरपड, दि. ३१ जुलै १९३५

# आमची बाग

( आमचा मुक्काम केळवे येथे आला. एका स्वतंत्र घरात आम्ही राहात होतो. नाव दिले मंगलाश्रम. या मंगलाश्रमासमोरील जागेत श्री. ल. बा. चुरी, श्री. द. ह. सावे व श्री. रा. बा. म्हात्रे यांच्या समवेत एक बाग केली. तिचे वर्णन )

मंगलकाली मंगलवेळी मंगल सुखदायी
कदलिवनीच्या 'मंगलाश्रमी' बगीचा मनमोही
गुलाब, तुळशी शेवंतीच्या मिश्रसुवासाची
सूर्यफुलाची मखमालीची शोभा गमतीची
सदाफुली ही सदा मनूची वृत्ति खुली दावी
अलि-कुल-फुल अनुराग क्षणाचा प्रेमि जिवा दावी
संध्यासमयी स्नेही चारी करी घेऊनि झारी
आणि आपल्या जिव्हाळ्याच्या बागे माझारी
शीतकराच्या शीतकरांनी शीतलता लाभे
बालार्कांच्या बालकरांनी नवजीवन लाभे
झुळझुळ पवनासंगे बगिचा प्रेमे जइ खेळे
कवि सुरगण नभी वाटसरूही आनंदे डोले

केळवे, दि. ८-१२-१९३५

# केळवे

आहे सागर खोल पश्चिमदिशे पूर्वेस तै खाजणे
खाड्या उत्तर-दक्षिणी असुनिया बेटापरि भासते
आले नारळ इक्षु आम्रहळदी केळी विविधापरी
शेवंती मखमाल चंपक जुई गूलाब पुष्पे वरी

वाणी ब्राह्मण माळि कोळि खिस्ती तैसे मुसलमानही
भंडारी मरुदेशि सागर-जिवि कुंभार ते बाहरी
कीराणी कृषि बाग शिंपि तैसे सोनार सूतारही
ऐसे उद्यमि लोक येथ वसती या केळवे भूवरी

कालीका शीतला हरूनी विपदा सुखास त्या अर्पिती
मारूती शीव रामचंद्र मिळुनि गावास की रक्षिती
जंजिरा भुईकोट विक्रम तुम्हा इतिहास या गावचा
दावीती; हिवताप शौर्यनगरी पण आजला पाहता

(त्याकाळी केळवे व माहीम ही गावे मलेरियाची माहेरघरे होती.)

केळवे, दि. १५-१२-१९३५

# विवाह - प्रित्यर्थ

( माझे मित्र श्री. काशीनाथ गणपत ठाकूर, नरपड यास त्याच्या विवाहाप्रित्यर्थ अपर्ण केलेली कविता )

आयूचा बघ हा वसंत सखया आहे अजी आपुला
जीवाचा फुलबाग मंगलदिनी खुलेल वाटे मला
प्रीतीचा बुलबूल तान मधुहि छेडील हो यापुढे
का होईल न हा प्रसंग वदण्या आनंद तुम्हा पुढे

सद्‌भावे वरिसि गुणी सुग्रहिणी वेणू वधू नाम हे
काशीनाथ सुमित्र योग्य वर ह्या दांपत्यि शोभा वसे
स्वामीची प्रिति-संपदा सुखविते संसारी हो अंगना
प्रेमाने सुमती धरूनि रक्षी मित्रा त्वदीयांगना

संसारी सुखी हो, समग्रही मिळो, उणीव काही नसो
सामाजी निजमातृदेशी तुमची सेवा सदाची वसो
अग्नी ब्राह्मण या समोर जलदी घ्या आण हो राजसा
धिःकारी वसनें विदेशि पुरती देशीच घ्या हो सदा

दीर्घायू करुनि सुखा वधुवरा द्यावे जगन्नायका
गुंफूनी कुसुमांजली तुजशि मी अर्पी स्विकाराल का ?

केळवे. दि. ८-२-१९३६

# थोर माझी माय ग !

( ‘ सांग मला केव्हा बाई । पावणार देव ग ’ या कवितेची प्रेमळ बाजू )

काय सांगु तुजला बाई। थोर माझी माय ग !
वाजतात पहाटे पाच । तोच आई हाका देत
घास म्हणे आधी दात । स्तवन तू करी ग ॥

हानि होत चहापायी । जाणुनि हे माझी आई
दूध रोज मजला देई । पाही माझे रूप ग ॥

कीति छान वेणी माझी । परी काय आकाशाची
आहे बाई मम आईच्या । शिक्षणाचे फळ ग ॥

चमचमीत पोहे चिवडा । लाडू त्यात आधी निवडा
शरीराचा नको चुरडा । सांगे मला रोज ग ।

रोज साफ धूतें अंग । नको पालटाया रंग
आईने तें चोळायाला । काय सान सांग ग ॥

घेऊनि तिच्या आज्ञेते । शाळेमाजी रोजी जाते
आई आणि बाई मजला । दोन ते गुरू ग ॥

ताई माझी सासरी गेली । आईच्या सुखाते मुकली
नको मला तसली पाळी । बाई स्वच्छात ग ॥

नको मला दुसरा देव । जगी एक माझा देव
नशिब माझे म्हणुनि मजला । आईचा हा लाभ ग ॥

केळवे, दि. १३–९–१९३६

# ती सीमोल्लंघने गेली !

एक काळ ऐसा होता । स्वातंत्र्य उपभोगिता ।। भारत ।।
जयी रामकृष्ण पांडव । शत्रूंते करी तांडव ।। विक्रमे ।।
पृथराज सिंह शिवाजी । राघोबा पहिला बाजी ।। वीर हे ।।

चमकले शूर अग्रणी । झुंजले रणी । तोडिले झणी ।
दास्य लवलाही । ती सीमोल्लंघने गेली ।। पूर्वीची ।।

पारतंत्र्य पंकी रुतला । दुर्दैवी आपुला देश ।। आजला ।।
हिंददेवी दीनपणाने । वदतसे दृढ आशेने ।। बापुडी ।।
लाडक्या पुत्रपुत्रींनो । राष्ट्राच्या भावि विरांनो ।। घ्या अशी ।।

घेईन आज मी आण । हिंद–भूप्राण ।। स्वदेशी वाण ।।
घेतले जाण । हे करू सीमोल्लंघन ।। खास हे ।।

बाळांनो दसरा आला । सर्वांना तोष जहाला ।। खचितचि ।।
परि विचार केला असता । हा तोष असे वरवरचा ।। कळुनिये ।।
सोनेही गेले लयाला । आपट्याचा पाला आला ।। ठायी त्या ।।

दूधाची तान ताकाने । भूक आशेने । समाधानाने ।
कशी भागावी । ती सीमोल्लंघने गेली ।। पूर्वीची ।।

केळवे, दि. २४–९–१९३७

## माझी मनी

मनी बघा ही । माझी मनी बघा ही ।
दृष्टमात्र लावू नका । कशी काढू मी ॥ धृ. ॥

बर्फावाणी गोरा रंग ।
कापसाचे जणू अंग ।
वेणीवाणी शेपूट ही । शोभते किती ॥

दिवाळी ही आज हिची
खाण्यामधि दंग कशी
मनमात्र शिंक्यावरी । ठेवूनी खाई ॥

किलबीले करी डोळे
म्याऊ म्याऊ शब्द बोले
भेडसावी आणि बाळे । लबाड अशी ॥

लाडकी हो माझी मनी
जरी दृष्ट लावी कुणी
चंद्रसूर्य ओवाळुनी । टाकीन जरी ॥

दूदू पीते माझी छबू
मोत्या करी भूभूभू ।
घाबरते तेव्हा माझी । गुणाची राणी ॥

केळवे, दि. २४-९-१९३७

# चि. हेमलतेचा पाळणा

(आमचे परममित्र श्री. दत्तात्रय हरि सावे, तारापूर, व सौ. रमा यांचे चि. हेमलता हे पहिले अपत्य. आम्हा मित्रमंडळीत हे पहिलेच मूल असल्यामुळे तिच्याबद्दल खूप कौतुक होते. पुढील तीन कविता तिच्यावर आहेत. येथे सुख–दुःखाचा दुर्दैवी संगम दिसेल!)

गुणी बाळ लते माझे गडे हेमलते
निजनीज झोके देते ॥ धृ ॥

तुज जन्म दिला क्षात्रकुळी प्रभुजींनी।
धन्य हे आणि तू ध्यानी ॥
शुर वंश तुझा साक्ष देई इतिहास
परि परके करिति उपहास ॥
तो कोट गडे छिन्न तारानगरीचा।
शूरांच्या शौर्य प्रतीकाचा ॥
झुंजले वीर गनिमाशी।
रक्षिले देशधर्माशी।
परि आज रिपू त्या ग्राशी ॥
हे आठवुनी काय सोनुले रडते।
निजनीज झोके देते ॥

किति साध्वि सखे उभय कुळी निर्मील्या।
आठवू किती गुणशाल्या
सति सावित्री किंवा जिजा दमयंती।
ऐशी तव आजी होती।
तव पितयासी आणि तसे तात्यासी।
नित प्रेमे धरि हृदयाशी ॥

गाऊ मी किती ग महती ।
आज ती नसे या जगती ।
उचलण्या तुला कटिवरती ।
हे आठवूनी काय रागिणी रडते ।
निजनीज झोके देते ॥
जरि 'पोटभरू' म्हणुनि आज अम्हि फिरती ।
ठेवू तू मनी नच खंती ।
निज जननीचे पांग फिटावे म्हणुनी ।
तळमळे जीव निशिदीनी ।
परि सर्व तुम्हा मदार बालावरती ।
उद्धार कराया जगती ।
बोललो बोल मी आता ।
जाणतो तुझा का आत्मा ।
या मुखारविंदी पुरता ।
तो भाव सये उमटवूनि का हसते ।
निजनीज झोके देते ॥

केळवे, दि. ९-७-१९३८

## चि. हेमलतेस –

भांडोनी नभप्रांगणी विहरता आलीस तू चंद्रिका ।
की मातापरदास्य-मुक्त-अंकी लोळावया देवता ।
की वाटे मज तू गुलाब कळि वा मातापित्याची लता ।
हेमलते सुख आयु आदिकरुनी देई जगश्चालका ।

केळवें, दि. ९–७–१९३८

## स्वर्गस्थ हेमलतेस –

### (सुनीत)

नाही पूर्ण अजून तूज भरली ती तीनवर्षे पुरी
का लोटूनि अम्हा निराश नगरी घे धाव देवाघरी
केली काव्य तुझ्यावरी पुरविले नानापरी कोडही
नाही ! नाही !! तरी अजून अमुचि इच्छा पुरी जाहली
या लोकी तुज खेळणी न पटुनि गेलीस खेळावया
की गेली नभकन्यकांशि रजनी खेळात भांडावया
नाही सर्वगुणांनी युक्त मुलगी देवाघरी दूसरी
हेवा भाव धरून नेली गमते चोरून देवे घरी
वाऱ्यची सहजी लकेर विलगे वा वीज उल्का जरी
उद्यानी कलिका विमान वरती पाहून वेड्यापरी
वाटे येइ रमून खेळ वरचा अंगास झोंबावया
आहे आस अजून तू झडकरी येशील भेटावया
बाले हेमलते ! किती स्मरू तुझ्या नाना लिलामालिका
आहे जीव जिवात तो परि गडे तू सांग भेटेल का ?

देदाळे, दि. २४ ४–१९३९

## वयस्क विद्यार्थी मित्रास -

( ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन पुणे या संस्थेतील १९४२ च्या ३० ते ४० वर्षे वयाच्या विद्यार्थ्यांस उद्देशून )

तीसी ऊलटल्यावरीहि मजला ही प्राप्त होई दशा
नाही ध्यानि मनी कधी मग कशा त्यावेळच्या कल्पना
माझ्या गेहि गृहीणी पुत्र इकडे मी संकटी की अशा
विद्याभ्याससमुद्र दुर्धर दिसे त्या पोहता येईना ॥

डोक्याला शिणवूनि रोज कितिदा मी वाचितो पुस्तक
वर्गामाजि मला किती शिकविती ते ऐकतो आणिक
नाही ध्यानि उरे उरेलहि कसे ती वेळ गेली पुरी
आता रेटु कसेतरी दिवस हे ठेवून दृष्टी दुरी ॥

बोलोनी तुम्हि रोजरोजहि असे नैराश्य का झूरता
देखा दृष्टी विशाल थोडि करूनी सृष्टीकडे हो अता
शास्त्रे आणि कला सदा प्रसविती ते ज्ञानि संशोधक
देशासाठि तनू मती झिजविती तेंही बघा आणिक ॥

गेली वेळ असे न बोलति कधी आयु तयांचे किती
विद्याभ्यासि वयाचि काय जरूरी हे नाहि का दाविती
एकाग्री मन लावुनी त्यजुनिया चिंतेस भीतीसही
आशावादि बनूनि कार्य करिता का लाभ राही दुरी ॥

पुणे, दि. १२ डिसेंबर १९४१

# हिटलर नाहि कुठे ?

( जाति – चंद्रकान्त )

( जर्मनीचा हुकुमशहा हिटलर यांनी त्याकाळी सारे जग हादरून सोडले होते. हिटलर विरोधी देशात 'हिटलर' ही शिवी झाली होती. ही कविता आमच्या प्राध्यापकांपैकी प्रा. रा. ना. झोळ व प्रा. नी. शं. नवरे यांना फार आवडली होती. )

दुसऱ्यावरती गाजवि सत्ता करूनि अरेरावी
'फोडा आणि झोडा' तत्त्वे वागविण्या लावी
जर्मनिचा जो वीर असा तो ठाउक चोहिकडे
परंतु बुध हो, सांगा मजला हिटलर नाहि कुठे ?

उशीर झाला कधी मुलाला येण्या शाळेला
किंवा झाला नाही घरचा अभ्यासहि त्याला
अशाच आणि इतर कारणें दयाक्षमेवीण
छड्या लगावी पंतोजी तो हिटलर तर कोण ?

करू नको हे करू नको ते जाई शाळेला
याद राख जर खेळायाला गेला या काला
जा बाजारी उचल बेबिला चष्मा घेउनि ये
हुकूम चुकता झोडी बाबा हिटलर नाहि कसे ?

नटणे थटणे तसे भांडणे ठाउक नाहि जिला
खस्ता खाउनि बाळांच्या जिव बेजारहि झाला
मधुर वचांनी गृहराज्याचा रथ जी चालविते
नवरोबा हे हिटलर बनुनी मारिति त्या सतिते

गाद्या गिरद्या उंच हवेल्या बागबगीचाही
मोटारगाडी फिरण्या खाण्या पक्वाने काही
सेवा करि जो गडी बिचारा त्या वेतन नाही
मार बुटाचा देइ शेटजी हिटलर का नाही ?

कोंडा खाण्या धोंडा निजण्या सौख्य असे भाळी
राबराबुनी पीक आणितो घाम किती गाळी
परंतु त्याचे सर्व पीक ने दुष्ट जमिनदार
हिटलर का तुम्हि अशा नराला नाही म्हणणार ?

शाळा गेही समाज मंदिरी हीच असे रीत
चालू जगातील राज्यपद्धती आहे कुठे नीट ?
हिटलरशाही गोंधळ घाली ही जिकडे तिकडे
म्हणून बुध हो, सांगा मजला हिटलर नाहि कुठे ?

पुणे, एप्रिल १९४२

# धन्य गुरुजी !

(ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणे या संस्थेचे प्राचार्य गुरुवर्य धैसास यांच्या सेवानिवृत्तीस उद्देशून — )

( चाल – हलुहलु दिनमणि हा उदयाचलि आला )

जय जय जय धन्य गुरुजि ! वन्दन तव चरणी
करित असे शिष्य अपुला नम्र होऊनी
प्रेमाने रक्षियले
ज्ञानामृत पाजियले
दुःख दिले, तरीही कृपा सर्व साहुनी
जन्मुनिया अपरान्ती*
करि सेवा सर्व प्रांती
लोक–हृदय गाठी अन्ती विजयी होउनी
कीर्ति – कमल – मकरन्द
पसरो आणि आनन्द
लाभो इच्छी 'अरविन्द' सतत जीवनी

*अपरान्त – कोंकण

बाडापोखरण, दि. २७–६–१९४२

# फुलांची शाळा

सूर्य उगवता क्षणी भरतसे शाळा बागेत
हासत खेळत मुले कशिबघा येती मौजेत
गुलाब जाई जुई चमेली चंपक निशिगंध
आणि मोगरा शेवंतीही येती शाळेत
सवेंच त्यांच्या फूलपाखरू–शिक्षकही आले
गुरुशिष्यांची प्रसन्न वदने पाहुनि मन धाले
" जाई बाळा रडू नको अजि नाहि मारणार
जाई बेटा आज तुला ते नाहि बोलणार "
गुरुजिंचि भिति घालविण्याची पाळि अशी नाही
पुष्पजननींना येत कधीहि; बघ ही नवलाई !
मानवि शिक्षक ' चूप बैस ' हा धडा देइ पहिला
' हसा ' पाठ हा देई गुरुजी या सर्वा पहिला
' हास्य ' केंद्र हे सर्व धड्यांचे हा शिक्षक ठेवी
जाऊनि सर्वांजवळी प्रेमळ शब्दाने शिकवी
हासवी डोलवि नाचवि गाणी गाउनि सर्व परी
प्रसन्नतेचा मधु वेतन घे शिक्षक मोद भरी
शाळा फुलांची तशी मुलांची मूल–फूल एक
' फूलपाखरू–शिक्षक ' परि जेधवा मिळे तेथ

बाडापोखरण. दि. २९–६–४२

# दुष्काळग्रस्त अबला

( दिंडी )

बाळ बोले ' दे आइ खावयास
भूक मजला किती सांगु लागली ग ! '
बाळ बिलगे आणखी माऊलीस
परी लावी ती पदर लोचनास
एक वर्षी आधार पती गेला
दुजे वर्षी दुष्काळ उभा ठेला
वादळाने ने पीक तिजे साली
चौथे वर्षि दुष्काळ – महागाई
संकटाच्या रांगेत उभी ऐशी
पाच वर्षांचा बाळहि गळयाशी
काम दुष्काळी निघे जाय तेथे
कुलिन असुनि ती खडी वाही माथे
चार दिवस लागला मुसळधारी
कुठुनी मजुरी मग उपाशी बिचारी
काल तिन्ही आणूनि मनी सुन्न
बाळही ते झोपले विनाअन्न

बाडापोखरण, दि. ३०–६–४२

# गुरे चारतांना —

( खेड्यातील गोवारी व गोवारीण – गुराखी व गुराखीण–यांचा प्रणय पाहून शहरी सुशिक्षित तरुणतरुणींना हेवा नाही ना वाटणार ? )

तो — का गोवारे बोलत नाही मुद्रा रागेजली
तुझी का ? सांग मला साजणी

तुझ्या संगती चारीतसे मी गुरे
परी तुला पाहुनी पोट माझं ग भरे
जरि काटा तुजला, कळ माझ्या सरसरे

नजर वाकडी हाती काठी मूर्ति जशी शोभसी
आज का बोलत नाही अशी

ती — का गोवाऱ्या लागसी तू पाठीशी
काळ वेळ तरी नाही का पाहसी
तो गाई–गोरा जाई बघ जाळिशी *

चल गोवाऱ्या वाळुनि आणू कोणि न त्या जाळिशी
उगीच का राग मम समजसी

तो — चल गोवारे जाऊ ऊतावळी
ते तुझे घोंगडे दे माझ्या जवळी
ती देवि भवानी मला आज पावली

म्हणूनि बोलली; पण जाऊतो " एकच " मज देनी
आणि मग चूकचुक ये कानी

बाडापोखरण, दि. ७–७–४२

* जाळ – आडोसा देणारे झुडुप

# पुनर्भेट

( पाठारे क्षत्रिय ज्ञातीतील चौकळशी व पाचकळशी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पाच पोटजातींच्या एकीकरणाची माझी मूळ कल्पना. त्याप्रमाणे एकीकरणाचे कार्य हाती घेतले आणि या कार्यासाठी वेडा झालो–भारावून गेलो. शेकडो वर्षे दुरावलेले पाच बंधू एकत्र येतात या आनंददायक भावनेचा आविस्कार या कवितेत आढळेल. )

पाठारे बंधुनो भगिनीनो पुनर्भेट ही चला
उजळली उषा ऐक्य मंगला ।
गळ्यात घालुनि गळा फुलवुया कोकणचा फुलमळा
स्मरूनी गत उज्ज्वल काला
काळाच्या ओघात जाहलो परस्परा पारखे
असूनी बहीण – भाऊ सखे
सारू या रूढीचा पडदा नसता दुरी
बोर्डी केळशी नरपड मुंबापुरी
नवनवी करू या पुनः सगेसोयरी
आणि एकरूप होउनि जाउ या उन्नत शिखरावरी
कितीही विघ्ने आली तरी
पोटजातीचे चिरे विखुरले दुर्दैवं आजला
एकीला हाच खरा अडथळा
चिरे चिऱ्यावर रचू लागु या टाकुन पाउल पुढे
उभारू भारत मंदिर खडे
ध्येय असे ठेवुनि आपुली पुनर्भेट होऊ दे
उभयता खरीखरी शक्ति दे
हं विचार आता कसला करता मनी
वाजवू तुतारि ऐक्याची निशिदिनी
सांगण्या समस्ता चल जाऊ धावुनि
पाठारे बंधुनो भगिनीनो पुनर्भेट ही चला
उजळली उषा ऐक्य मंगला

बोर्डी, दि. ९ ऑगस्ट १९४५

# वनवासी शिक्षक

(१९४६ साली-स्वातंत्र्यपूर्वकाली-त्या वेळच्या संपूर्ण मुंबई इलाख्यात प्रा. शिक्षकांचा अभूतपूर्व संप झाला. या संपाच्या तयारीत मी प्रथमपासून नेतृत्व करीत होतो. परंतु त्यावेळी आमचे नेते आचार्य दोंदे यांच्या आज्ञे वरून मी ठाणे जिल्ह्यातील नोकरी सोडून मुंबईला आलो त्यामुळे या संपात मला भाग घेता आला नाही. जेव्हा संप सुरु झाला तेव्हा आपण भाग घेऊ शकलो नाही या भावनेने मन अस्वस्थ झाले. जीवाची तगमग झाली. अक्षरशः त्या दिवशी रडलो. या दिवसात व्यक्त झालेल्या भावना या एकूण चार कवितात दिसतील.)

आज हा चालला वीर वना । कुणा येईल का करुणा ! ॥ धृ ॥

प्रामाणिक तू राहुनि कामी
पुरा जाहला आणि रिकामी
ढळढळ रडला अपुल्या धामी
परि कुणी केली विचारणा ? ॥

राष्ट्रविचारा धरूनि बसला
दारिद्याच्या पंकी कुजला
नाही दयेचा कुणा उमाळा
चोर सारे उलटले ना ॥

युद्ध पेटले चहू बाजूला
उखळ पांढरे झाले सकळा
सर्वस्वाचा होम जाहला
तरी रिकामा कर दीनवाणा ॥

दौर्बल्याचे झुगारिले जू
नाही पाहिले आजूबाजू
कुणी मांडू दे न्याय तराजू
विजय तुझा कर निडर मना ॥

दादर, दि. २०–२–४६

# चल ऊठ

चल ऊठ, ऊठ झडकरी शिक्षका निशाण घे संपाचे
छाति करूनी पुढे घोष दे 'जयहिन्द' वाचे
कुणी निर्मिले गांधी जवाहर सुभाष अरुणांना
कोण वाढवी राष्ट्रोद्यांनी नाजुक रोपांना
राष्ट्राचा तू खरा पुढारी तूच राष्ट्रवीर
राष्ट्रीयतेचा पाठ दुजाचा फुकाच ठरणार
पोटासाठी झगडा करणे हक्क असे सर्वा
कुणी कसाही विरोध करु दे काय तुला पर्वा
आजवरी तू स्वस्थ बैसला हाच गुन्हा केला
आता तरीही भेद धरूनि नको दवडू वेळा
दोंदे सावे कोष्टि गोखले भिसे आदि नेते
मदत कराया तुम्हा धावती 'लोकमान्य' पत्रे
मुंबापुरीचे बंधु तुमचे आणि भगिनीही
समस्त जनता विद्यार्थीगण येतिल लवलाही
स्वार्थासाठी राष्ट्रविरोधी लढा तुझा नाही
परवशतेच्या बुरुजाला हा सुरुंग आतूनही
ध्येयमूर्ति तू त्यागमूर्ति तू कष्टमूर्ति तूच
परंतु बनुनि भूकमूर्ति तु दुर्बल झालास
धीर धरी ! धीर धरी !! धीर धरी आता !!!
ध्येय–ध्रुवाशी नजर लागू दे ढवळू नको चित्ता

दादर, दि. २०/२/४६

# संपावर चाललेल्या शिक्षकास–

( संपावर चाललेल्या शिक्षकास कोण काय म्हणेल – )

आज हा चालला वीर रणा
विजयी करी तू दयाघना ॥ धृ ॥

विद्यार्थी – प्रेमळ वचने शिक्षण दिधले
राष्ट्रप्रेमामृत पाजियले
जीवन–युद्धी अता उतरले
स्वस्थ कसे अम्ही बसु सांगाना ॥

शिक्षकाची मुले – वस्त्र नवे खेळणी खाऊही
मागुनही कधी दिधली नाही
आता तर घरी रहाल तुम्ही
हट्ट नाही धरणार अता ॥

शिक्षकाची पत्नी – असह्य दैना म्हणुनि भांडले
आता सारे मला उमगले
क्षमा करा मी सोसीन सगळे
नका काळजी करू मम राया ॥

जनता – 'शिक्षक आणि लढा' पटेना
उघडविले पण अमुच्या नयना
स्वस्थ अता ना राहू सदना
शापवाणि न हो हीच प्रार्थना !

दादर, दि. २१–२–४६

## सेवा फकिरास—

( माझे परममित्र सेवाफकीर श्री. द. ह. सावे यांना सोडून मुंबईस आलो त्या-बद्दलची खंत व त्यांचा गौरव )

सेवाक्षेत्रि समस्त अर्पिति असे ज्या लाभती सेवक
तेथे संघटनादि कार्य बनुनी होई यशोदायक
जेथे साधतसे सूयोग असला जो अल्प साऱ्या जनी
आहे शिक्षक संघ एक अमुचा त्या धन्यतेचा धनी ॥

संघाचा दरबार बंद युवका होता जयी एकदा
बंडाचा ध्वज हाति घेउनि पुढे मूर्ती निघाली तदा
निर्मूनी नवपक्ष प्रांतभरही वेढा दिला त्यासही
होवोनी विजयी खरा धिरमणी वाही धुरा आजही ॥

झाले युद्ध महर्गता भडकली आली कसोटी खरी
बांधी कंबर प्रांतही उठविण्या चाले भ्रमंती पुरी
नाहीभूक तहान पूर्ण कपडे छत्री वहाणा तरी ?
लोटोनी गृहसौख्य स्वार्थहि तसा हा मग्न कार्यांतरी ॥

मित्रा धन्य तुझी फकीर बनला या घोर वेळी खरा
नाही साथ हवी तशी करित मी हा खेद होई पुरा
कोठे पेढि कुठे सभा तर कुठे दौरा यशस्वी करी
वृत्ती साधि निगर्वि राष्ट्रीय अशी शत्रूहि हेवा करी ॥

दादर, दि. १०–१२–४६

## वारली–वरनोवरी (वारली भाषेत)

(जाति – प्रविसूर्यकान्त – मात्रा १३)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

**वर** — येकानं येइ लोठी
हारि हारि करू ग गोटी
तुला दिनासि नांगं जरी
क्या नाही वळखं तरी
चल चढू आज बारड
तेथं होलि मारू रगड
मी घे धनू कुबीठ
तू घे बांधुनी मीठ
जसं जसं वरति चऽढल
घामानं अंग भीऽजल
डोळं भरून मी नांऽगल
पोट धरून मी हांऽसल

**वधू** — तुजी प्रीत वळखं खरी
पण गोट सांग मी बरी
बोल देज लग्नालं
कोठनं काढ पैशालं
जाऊन शेटच्या वाटं
देशील तथं आंगुठं
जनमभर खपावं जरी
पसं नाही वळाचं तरी
सुडका मिळल न अंगाला
गाळि खाऊ रं दिनाला
यासाठी तुला मि सांगं
नको शेटच्या मागं

जरि नाय लगीनं जाहलं
तरी राहू कोरडं भलं
करू शेती फिरू जंगल
करवंद कंद नि मूलं
खाऊ नाचू कामडं
कबुल हो त ये बारड

**वर** — बेस ग तुजा वीचार
नकोच हा सावकार
दोघं राजा नि राणी
क्या भरू कोणाचं पाणी ?
आता करू नको ग खोटी
हारि हारि करू ग गोटी

---

**शब्दार्थ** - लोठी – उपवर मुलगी, गोटी – गोष्टी, बारड – कैनाडचा डोंगर, कुवीठ – बाण, बोल – वाङनिश्चय, देज – हुंडा, कोरडं – लग्ना-शिवाय नांदण्याचा रूढ प्रघात, कामडं – एक वारलीनाच, नांगणे – पहाणे, सुडका – नेसू पातळ, बेस – चांगला.

नरपड, दि. २५-२-४७

# सत्कार-सुमनांजलि

( डॉ. मधुकर ब. राऊत हे मुंबईचे नगरसेवक झाले म्हणून त्यांचा सो. पा. क्ष. समाजाने दि. १७ मे १९४८ रोजी कें. माहीम येथे भव्य सत्कार केला त्या निमित्ताने-)

धन्य धन्य आज गमत दिवस दिवाळीचा
सुगुण आणि सेवा सत्कार थोर यांचा
नाहि असामान्यपण
नाहि काही दैवि खुण
आणि विपुल नाहि धन तरि विशेष ह्यांचा !

शील तेज सदय हृदय
विद्येते वरित विनय
सेवेचे सतत वलय वास सद्‌गुणांचा !

तनमनधन अर्पुनिया
सकला सांभाळुनिया
सन्मार्ग दावुनि उद्धार कितीकांचा !

कीर्तिसूर्य नभि तळपो
दीनांचे तम हरपो
सत्कारा संधि मिळो हेत हा मनाचा !

नरपड, दि. १ मे १९४८

# जीवन साफल्य

कोवळी कळी !
किती कोड कौतुक केले तिचे
पण अकाली तोडली
एका अरसिकाला दिली. टाकून गेला तो तिला
काय करणार बिचारी !
रडरड रडली. निसर्गधर्माने वाढली
आता ती कळी राहिली नव्हती
सुंदर फूल झाले होते
झाडाविना फूल आश्चर्यच !
फूल हसत होते पण कृत्रिम
दुसऱ्या करिता – दुसऱ्यांनी हसावे – खुलावे – म्हणून
हे सतत चालू आहे
स्वतःचे दुःख, स्वतःच्या आशा-इच्छा - त्याला काही नाही
सर्व दुसऱ्यासाठी
पण या जीवनात तरी सुख आहे का ?
कसे असणार ?
ज्याची सुखे आपली मानली
ज्याच्यासाठी हे निरस जीणे जगण्याचे ठरविले
त्याच्यावरील दुःखपरंपरा पाहून हेहि दुःखी होई
एकंदरीत सुख कुठेच नाही ?

आहे मानले तर आहे
इतक्या दीर्घ व दुःखी जीवनात प्रेम करणारे
आस्था बाळगणारे कुणीतरी असेल
त्यातच आनंद मानला पाहिजे
दुसऱ्या साठीच हसले पाहिजे
यासाठीच आपण जगतो असे वाटले पाहिजे
नाहीतर काय करणार !
आपल्या हसण्याने, आपल्या सुखद सहवासाने
एकतरी जीव समाधानी होत असेल
तरी जीवनाचे सार्थक झाले असे होईल
जीवन साफल्य ते हेच !

दादर, दि. १ मार्च १९५१

## उगीच का जीव घात !

( आत्महत्या करणारांना उद्देशून )

उगीच का जीवघात ! ॥ ध्रु. ॥

आयुष्याच्या असफलतेतुनी
विकार उठती उंचबळोनी
' नको राहणे ' असे ठरवुनी
अविचाराने उठुन जगातुन खुशाल घेई धाव ॥

परीक्षेत कमनशिबी ठरणे
भग्न कुणाची प्रेमप्रकरणे
आणि धंद्यामधे घसरणे
कितीक ऐसी खुळी कारणे मनास लावून तात ॥

मुले कुणाची अनाथ होती
स्वकीय सारे अन् हळहळती
दुनियेचे व्यवहार चालती
वेडे नाहक मरुनि जाती करूनि जिवाचा घात ॥

दुर्लभ हा नरदेह सांगती
नानायत्ने त्यास पोषिती
सुखदुःखाची कधी ना क्षिती
म्हणून ' सबसे प्यारा ' म्हणती विसरून हे करी नाश ॥

" असेल काळा हाती मरणे
परी आमुच्या हाती जगणे
का न मग वीरोचित मरणे ?"
कुणा कवीचे असे सांगणे ठेवू या स्मरणात ॥

दादर, दि. १ मार्च १९५२

# जग स्मरेल तुजला एकदिनी —

( ॲटमबॉम्ब व हैड्रोजन बॉम्ब यांची पैदास व जगाची सद्यस्थिती पाहिली तर गांधीजींनी दाखविलेल्या मार्गाची अवहेलना करून जग भयंकर अशा तिसऱ्या महायुद्धाकडे चालले आहे असे वाटते. पण केव्हातरी एक दिवस असा येईल की त्यावेळी जगाला गांधीजींची आठवण येईल. )

जग स्मरेल तुजला एकदिनी
गांधीच हवे या प्रलयदिनी
जीवाचे जीवाला खाणे
राष्ट्राचे राष्ट्राला गिळणे
हुकूमशाहीचे ढोल बडविणे
रीत जगाची युगायुगाची
राहणार अशी का प्रश्न मनी ?
कितीक युद्धे झाली होतील
रक्ताचे सागर भरतील
जीवनमूल्ये तयात बुडतील
परि अंती येईल एक क्षण
की नको जगा हे रणांगण
सत्य अहिंसा अस्त्रे घेउनी
भारत देशा विमुक्त करूनी
अणूशक्तीला धक्का देउनी
सन्मार्ग जगा दाविला परंतु —
जग खुळे चालले त्याच पथी !

दादर, दि. २–७–१९५२

# चल पुढे—

( जाति – नववधू )

चल पुढे असा का डगमगशी
माघार सुचावी ना तुजशी ॥ धृ ॥

ध्येयपूर्तिची तुझी प्रतिज्ञा
करो कुणी वा क्रूर अवज्ञा
हीच कसोटी असते सुज्ञा
कर विचार ह्याचा निमिषभरी ॥

त्यागाचा सेवेचा झेण्डा
धरुनि निजकरी उठला बण्डा
का भीतो मग समाजगुण्डा ?
' सत्यमेव जयते ' मंत्र स्मरी ॥

अज्ञानाचा दुस्तर डोंगर
रितीरूढींचा जुनाट फत्तर
विद्वेषाचा अथांग सागर
फोडुनी उल्लंघुनी किनारी —

दादर, १ ऑगस्ट १९५२

# मीराबाई

( मूक अभिनयासाठी – टॅब्लो )

एके दिवशी नृपवर रागे निजपत्नीते बोले
कन्या अपुली मिराबेन नच सोडिजेल हे चाळे
अपकीर्ती मग होईल अपुली साऱ्या दुनियेमाजी
न सहवे मज नको मुली ही विष दे तवहाती
ऐसे म्हणूनि नृपति सत्वर विष आणवि पेल्यात
पत्नीहाती देउनि तिजला पाठवी हरिसदनात
भ्रतारआज्ञा न मोडवे तिज शोकाकुल मनि झाली
रडत रडत ती दीन माउली कन्येजवळी आली
धीर न होई हात थरथरे शब्द न उमटे वदनी
अस्फुट वचनी म्हणे लाडके काळ तुझा ही जननी
प्राशन करण्या वीष दिले हे राये तुजला बाळे
अधोवदन होऊनि अश्रूंनी आणि भरले डोळे
मातेचा हा मोह पाहुनि मिराबाई मग बोले
क्षणभंगुर तनु जाईल विलया का तुज दुःख जहाले
श्रीकृष्णाच्या चरणी माझे अर्पियले जीवन मी
योग्य संधि ही मला लाभली दुःख नको या कामी
असे म्हणुनि निर्विकार चित्ते पेला घेई हाती
आई बिचारी तिची बाजूला अधोमुखाने राही
मिराबाई मग कृष्ण सन्मुखी गुडघे टेकुनि बैसे
आणि म्हणे वनमाळी आता करू सांग मी कैसे !

मृत्युला मी न भी परंतु लोक दोष देतील
भक्ती करता मिरा विषाने मेली जन म्हणतील
भक्ती मंदावेल तुझी हा विचार मजला जाची
पूजा अर्चा तुझी श्रीधरा कोण करील मग साची
पांडव ध्रुव प्रल्हाद द्रौपदी यांचे संकट बघुनि
धावुनि आला तूच मुरारी मिथ्या न ठरो अवनी
आता वेळ न दवडी श्रीहरी प्रसाद म्हणुनि घेते
अकस्मात अंधार जाहला माता थरथर कापे
परंतु अघटित काय दिसे हे विश्वास न बसे नेत्री
कृष्णमूर्तीचा हळहळु बघ रंग पालटे गात्री
विस्मय पावुनि माता धावुनि घऊन आली पतीशी
दिव्य दृश्य ते पाहुनि राया लागे हरिचरणाशी

दादर, दि. १३-९-१९५२

## समाजसुंदरीस—

( प्रिय सखीस समाजरूप मानून )

तुझ्या दर्शनाने माझी ।
कोटी दुःखे हरपती ।
तुझ्या एका कटाक्षाने ।
मला मिळे संजिवनी ।
तुझे अमृताचे बोल ।
मला वाटती अमोल ।
तुझ्या आधि तुझ्या व्याधी ।
तुझ्या आणि त्या उपाधी ।
जरी जाच तुला आधी ।
तरी मलाही जाळिती ।
गडे महालक्ष्मी देवी ।
आणि डोंगरीचा पीर
नवसिले वेड्यावाणी ।
तुझ्या सुखासाठीच मी ।
नको मला ही दिवाळी ।
नको मला हवी होळी ।
तुझ्या प्रेमसेवेसाठी ।
पसरीत राही झोळी ।
कधी घेशी डोकीवर ।
कधी रागाचा विचार ।
तरी सेवेचा निर्धार ।
हेच जीवनाचे सार ।
फुलू खुलू नि डुलू दे ।
सर्व सुखाते लाभू दे ।
ध्येय – ध्यास हा अंतरी ।
सखे समाजसुंदरी ।

दादर, दि. १-१०-१९५४

# पंचवर्षीय चालनेस —

( वृत्त – सुमंदारमाला )

विनाशातुनी देश दैवे निघाला
सुरु जाहले कार्य लोकोद्धरी
करावी यथाशक्ति सेवा जनांची
म्हणोनी तुझा जन्म या भूवरी
किती भिन्न जाती किती भिन्न रीती
कसे ऐक्य व्हावे नव्या भारती ?
कुठे गेह वा गाव वा ज्ञाति तेथे
अजि जाहली पाहिजे जाग्रती
तुझी अल्प शक्ती तुझी अल्प बुद्धी
तुझा वासहि अल्प क्षेत्रांतरी
तरी कार्य केले सतीच्या व्रताने
अखंडीतही पंच संवत्सरी
तुझ्या वर्षनी वाहिली घोर चिंता
प्रपंची उपेक्षा सदा दावुनी
परी कष्टलो ना सदा दिव्य आनंद
त्वत्संगती धन्य मी सेवुनी !
कुणी पाहु दे वक्रदृष्टी, करो वा
कुणी कोड कौतूक काही तरी
तुझा चालु दे चालने ध्येयसिद्धी–
कडे ओघ नित्या सरीतेपरी

दादर, दि. १–१२–५४

# कर माझे जुळती !

( कर्मवीर दादोबा ठाकूर यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त. कवितेत नावाचा उल्लेख नाही. ही कविता चालनेत वाचल्यावर दादोबांनी मला विचारले, ' ही कविता कोणावर ? ' आणि मी कबुली दिली होती. )

सदुसष्टावी आज जयंती म्हणुनि कर माझे जुळती ॥ धृ ॥
युक्तीबुद्धीने जीवन नटले
घोर तमातून मार्ग उजळले
उद्यम – मंदिर भव्य उभविले
पाहुनि मंगल कीर्ती ॥
समाजराष्ट्रा नित्य स्मरूनी
कलागुणांना उत्तेजवुनी
गुप्तदान उपकार न बोलुनी
सार्थ जीवन हे जगती ॥
स्वकुलाते आपण भूषविले
इष्टमित्र कधि ना अंतरिले
असंख्य गरिबा पालक बनले
अति थोर ही सद्वृत्ति ॥
समग्र जीवनपट मी स्मरतो
नत मस्तक प्रभुते प्रार्थितो
सुखस्वास्थ्य आरोग्य इच्छितो
करी त्यांना आयुष्यमति ॥

दादर, दि. २९-१२-१९५५

# एव्हरेस्टचे आव्हान

( तेंनसिंग नि हिलरी यांनी हिमालयाचे अत्युच्च एव्हरेस्ट शिखर जिंकले या निमित्त मूक अभिनयासाठी )

**एव्हरेस्ट** —

हिमाचलाचे उंच शिखर मज एव्हरेस्ट म्हणती
पृथ्वीवर पायथा तरी उन्नत शिर मम स्वर्गी
मानदंड अवनीचा असे मी शुभ्रधवल कीर्ति
चंद्रतारका नक्षत्रादि मम संगे वसती

हे क्षुद्र मानवा विज्ञानाचा तुला
गर्व असे परि अजिक्य मी आजला
दे सोडुनि बेता का करिशी वल्गना

कितीक मेले कितीक मरतील अजिंक्य परि राहीन
नरचरणाचा स्पर्श कधी मी होऊ न देईन

**तेनसिंग** —

पंचभूतांना दास बनवि हा मानव हे गिरीवरा
ऐट का दावितोस पामरा

काळाशी झुंजीन हिमकडे पायदळी तुडवीन
आणि मी गर्व तुझा जिरवीन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य २५८०
शाखा (स्थळ प्रत)

**गिर्यारोहक**— (चाल - फटका)

सर्व करोनी नीट तयारी
आम्ही गिर्यारोहक भारी
करू हिमगिरी वरती स्वारी
तेनसिंग अन् वीर हिलारी
पहा चालले कसे पुढारी
चल देऊ या साथ सत्वरी
कड् कड् कड् कड् कडे कोसळती
मेघांचीही झाली दाटी
अंधार दाटला मार्ग न दिसती
भयाण नाना विजा चमकती
तरी न जुमाने वीर तेनसिंग
वज्रदेही हनुमान जणू हा
किंवा गोवर्धन गिरीधारी
स्वर्गराज देवेंद्र चडपडे
सदेह मानव कोण वर चढे ?
सृष्टि चराचर स्तिमित जाहली
आश्चर्याने पाहू लागली
पाहा पाहा पाहा पाहा !

तेनसिंग आणि ह्लिारी
गिरी शिखरावर आरुढ स्वारी
घेऊनि हातामधि तिरंगा
विजयिवीर हा डौलात उभा

(चाल बदलून –)

जय जय जय जयका ऽ ऽ र
भारतभूषण धन्य तेनसिंग
करूनि मृत्युवर मात
पुष्प समर्पुन तुला आदरे
गातिल तवगुण गा ऽ ऽ न
जय जय जय जयका ऽ ऽ र

दादर, दि. ५-९-५६

# माझा महाराष्ट्र आला

आला माझा महाराष्ट्र आला
हर हर महादेव बोला !
‘ झालाच पाहिजे ’ नको
‘ झालाच की नाही ’ बोला !
काळ्याकुट्ट ढगातून
मृगधारा याव्यात तसा आला
सागराच्या मंथनातून
सुरासुरांच्या मर्दनातून
‘ अमृत–कलश ’ मिळावा तसा आला
भारताच्या स्वातंत्र्याला अमर करण्यासाठी आला
शतका शतकांच्या, युगायुगांच्या
आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आला
साडेतीन कोटींच्या अश्रूजलांच्या
सरोवरात ‘ अरविन्द ’ फुलावे
तसा सुगंध पसरीत आला
मराठ्यानो, उठा. बघता काय वेड्यासारखे
खरच आपला महाराष्ट्र आला !
नाचा – गा – बेभान व्हा !
जातिभेदाची जळमटं तोडून टाका
अस्पृश्यतेचा व निरक्षरतेचा डाग पुसून टाका
बेकारीच्या भस्मासुराला भस्म करा
शक्ति आणि बुद्धी विद्या आणि उद्योग
यांची बाग फुलवा
सिंधुसागरासारखी विशाल
आणि विदर्भाच्या कापसासारखी
शुद्ध मने करा
शेतकऱ्यांनो, कामकऱ्यांनो, कारकुनांनो
गळ्यात गळा घाला नि म्हणा –
माझा महाराष्ट्र आला !
हर हर महादेव बोला ! !

दादर, दि. १ मे १९६०

## द्वादश वर्षीय चालनेस--

( 'चालना ' मासिकास एक तप झाले या निमित्त )

(सुनीत)

वीसावे शतकार्ध संपुनि दुज्या अर्ध्यासवे जन्मली
झाली द्वादशवर्ष आज तुजला संतोष्र झाला मनी
जातिभेदविनाश शिक्षण कृषी इत्यादि प्रश्नावली
काळाते अनुलक्षुनी नव दिशा त्या दाविली तू जनी

सेवा ज्ञान समानता सृजनता घेवोनी ऐशा व्रता
जन्मा ये मम गेहि मंगलदिनी तू चालने लाडके
कार्यांचे तप एक पूर्ण करूनी नीर्मी परी योग्यता
नाही द्रव्य तुला नसे घर तुला आधारही तोकडे

नाही वैभव लाभले तरि तुला सोसोनि नाना पिडा
लेणे लेवविले सुते नवनवे वीचाररुपी सदा
झाला गौरव थोर थोर सुजनी सन्मान हा केवढा !
पुण्याई तव लागु दे जनपदी हेतु दुजा ना कदा ॥

× × ×

पाहू कोण तुझ्याकडे वळवितो ती क्षुद्र दृष्टी सदा
आता ऐकव बोल निर्भिड तुझे चैतन्य दे सर्वदा

दादर, दि. १-१-१९६२

## भाई नच अमुचे गेले !

( समाजसविता डॉ. मधुकर ब. राऊत यांच्या दुःखद निधनाची बातमी ऐकून – )

कुणि वदले एके सकाळी
की अपुले भाई गेले !
शब्द ते ऐकुनि कानी
आकाश शिरी कोसळले !
ना सुचे ना दिसे काही
गोठले हृदय जणु देही
क्षण अशा अवस्थेमधुनी
सावरूनि मम ये ध्यानी
बातमी खरी नाही ही
मज मूढा कळली नाही !
अमृतमय जीवन ज्याचे
अमृतास मृत्यू कैचा ?
रुग्णांस गमे संजिवनी
संजिवनी मृत होईल का ?
दानशूर ज्याचा हात
भिरू काळ त्यास स्पर्शिल का ?
चैतन्य रोमरोमात
ते कधी नष्ट होईल का ?
जनमनात अढळ स्थान
त्या ध्रुवा कुणी उठविल का ?
जा जाऊनि सांगा काळा
जा जाऊनि सांगा सकळा
वेड्यानो भलतेसलते
वदु नका अशक्य असे ते
भाई नच अमुचे गेले
भाई नच कधि जातील
कुणि नका बोलू ती वाणी
अरविन्द वदे कळवळुनी

दादर, दि. २५ जाने. १९६२

# सीमापार—

( चीनने १९६२ साली भारतावर स्वारी केली त्या प्रसंगास उद्देशून — )

हर हर महादेव बोला !
स्वातंत्र्यावर पडला घाला । धावा हो धावाऽऽ ॥ हर० ॥

तुंग हिमाचल पवित्र आम्हा प्राणाहुनि प्यार ।
जिथे चालतो उमा-शिवांचा सुंदर संसार ।
त्या भूमीवर रिपुने केला । कपटाने हल्लाऽऽ ॥ हर० ॥

स्वातंत्र्याच्या मोलासाठी घेऊ तलवार ।
क्षात्रतेज दाखवू शत्रुला करू सीमापार ।
अद्दल घडवू जन्माची त्या । पुनः न कधी वळलाऽऽ ॥ हर० ॥

ऊर्वशीयम् अन् लडाख प्रांती आता मुक्काम ।
एक इंच ही जागा घेता बोलवु त्या ‘ राम ’ ।
धडधड धडधड आग ओकुनि बेचिराख केलाऽऽ ॥ हर० ॥

दादर, दि. १–७–१९६३

## देवलोकी –

(कर्मवीर दादोबा ठाकूर यांच्या दुःखद निधनास उद्देशून)

कर्मयोगी यंत्रतज्ञ गुणग्राही यशोनिधि,
ठेवोनि सत्किर्ति ही देवलोकी विराजसी

## टाऽ टाऽऽ –

(मुंबईत ‘ ट्राम ’ या वाहनाचा अस्त झाला त्या दिवशी)

ट्राम ट्राम घे आराम
नाही तुझे काम
होतीस छान, कमी दाम
गरिबांचे वाहन
मुंबापुरीची शान
पुढे चाले कालमान
त्याने कापली तुझी मान !
पण न विसरू तुझे स्थान
घे प्रणाम, घे सलाम
ट्राम ट्राम, रामराम !

दादर, दि. १ एप्रिल १९६४

# हाय ! अश्वत्थ वृक्ष उन्मळला !!

( भारतरत्न पं. जवाहरलाल नेहरू यांच्या महानिर्वाणास उद्देशून –)

देशाला सावली नि संरक्षण देणारा
जगाला शांति देणारा
अनेक संकटांना व झंझावातांना
दाद न देणारा
महान् अश्वत्थ वृक्ष
अखेर उन्मळला !
काश्मिरी गुलाबाचे सौंदर्य
व सुगंध ज्यात होता
हिमालयाची भव्यता
नि गंगेचे पावित्र्य
ज्यात होते
रामकृष्ण बौद्ध व बापुजी
यांच्या सद्‌गुणांचे
खतपाणी ज्यास लाभले होते
असा अपूर्व अश्वत्थ वृक्ष
उन्मळला !
ज्याच्या शाखा आसेतुहिमाचल
पसरल्या होत्या
ज्याची मुळे भारतभर
पसरली होती
ज्याच्या सळसळणाऱ्या पानातून
भारताचे भवितव्य नि स्वातंत्र्य
तळपत होते
असा दिव्य
अश्वत्थ वृक्ष उन्मळला !
वृक्ष उन्मळला नि धरणी हादरली !

मानवता धाय धाय रडली
चाळीस कोटी जनता उघडी पडली
भारताचे व्यास महर्षि उद्गारले,
" एका युगाचा अन्त झाला ! "
आता ?
आता उन्मळलेल्या वृक्षाच्या ठिकाणी
पुनः अंकुर फुटत नाहीत
' गीतेच्या ' अश्वत्थ वृक्षासारखा
वृक्ष पुनः होत नाही
म्हणून –
वडांनो, ताडांनो, माडांनो नि पांग्याऱ्यांनो
एकत्र या. एक समयावच्छदेकरून
पडणारी सावली द्या
नव्या युगाचा उदय
अनेकातून एकत्व साधणारा होऊ द्या
जगाला कळू द्या
भारताने आपला तोल सावरला
जरी अश्वत्थ वृक्ष उन्मळला !

नरपड, दि. २७ मे १९६४

# उद्याचा जन्म

माझे नाव 'उद्या' आहे
माझ्या धाकट्या भावाचे नाव 'परवा' आहे
वायद्यासाठी लोक मला वापरतात
कधी कधी भावाचा उपयोग करतात
लबाड लोक माझ्या पदराआड लपतात
त्यामुळे सज्जनांचा संताप होतो
व मी बदनाम होते !
या जीवनाचा मला कंटाळा आला आहे
हे काळ पुरुषा !
या बनव्यांच्या हातून मला सोडवा
त्यासाठी प्रलयकाळानंतरच्या कालखंडात
मला 'उद्याचा' जन्म नको !

दादर, दि. १–१०–६५

# खजुरीची खळबळ

( दारू-ताडी बंदीचा सरकारी प्रयोग फसला आणि पुनः उघड ताडी सुरू होणार अशी बातमी पसरली तेव्हा एक खजुरी-शिंदी-( ताडीचे झाड ) विचारते —)

संपले का माझे नष्टचर्य ?
संपले का माझे सक्तीचे ब्रह्मचर्य ?
या वीस वर्षांच्या स्वराज्यकाली
सती सावित्री शिंदीला शिंदळ बनवली

अरे, तडातपाशांचे राज्य कधी चालले ?
भिख्खू-श्रमणांचे शेवटी काय झाले ?
देवदासी देवाला अर्पिली
अंती कुजनांनी ती उपभोगिली
लाजलज्या नीतीधर्म नि राज्ये कोसळली !
हा इतिहास आहे हा इतिहास आहे
म्हणे आता सरकारला सुबुद्धी सुचली !
पण हे सत्य आहे का ?
सत्तांधांना सत्य दिसते का ?
मी स्वप्नात तर नाही ना !

*　　*　　*

शेता शिवारात वावरणारी मी वनबाला आहे
तारुण्यमदाने रसरसलेल्या शरीराची
मी मदभरी देखणी कुलवधू आहे
पीळदार बांध्याचा भंडारी युवक
मजसाठी वर नेमस्त होई
आणि शरदाच्या सुखद काली
आमचे शुभमंगल होई
अगदी सरकारमान्य रजिस्टर पद्धतीने

पण त्या अरसिक शासनाला
ते पाहावले नाही
माझे भाव जीवन नष्ट केले गेले
अरे, राजा रसिक असावा
राज्यात सर्वत्र वसंत ऋतु फुलावा

* * *

दीपमालेसम ठसाळलेले निमूळ शरीर
रूळणारा मुक्त केससंभार
उभारलेले सुरसाचे लोभस उरोजकुंभ
पीतवर्णी नवपरिणिता, नवप्रसुता माता



अशी मी –
जेव्हा वत्सलतेने बांधावर उभी असते
तेव्हा –
उन्हातान्हात घाम गाळून
दुपारी नि संध्याकाळी

माझी कृषकबाळे
मजकडे तृषार्त नजरेने व आशेने जेव्हा पाहातात
तेव्हा मला पान्हा फुटतो
— आणि घड्यात एकदाच धगवून
वडाच्या वा कुंभाच्या पानातून
माझ्याच सावलीला बसून
जेव्हा ते सूरपान करतात
तेव्हा त्यांच्या स्वर्गीय आनंदाला
तथाकथित लब्ध प्रतिष्ठांची दृष्ट लागावी !
श्रीमंतासाठी शॅंपेन, व्हिस्की नि ब्रँडी
खुली अन् शक्य आहे
पण अवघ्या पंचवीस पैशात
गरिबांचा हा आनंद आहे !
कधी कधी अतिरेक करतात कुणी
घर पेटविले कुणी तर काय करील अग्नी ?

* * *

उमरखय्यामने वारल्याच्या पोटी जन्म घेतला तर तो म्हणेल,

“ या विस्तीर्ण शिवारात
या इथे खजुरीच्या तरुतली
असावी प्रियतमा एक लोठी
अन् सुरेची भरलेली लोटी
तारपे द्या एक मज हाती
मग थुंकेन मी दिल्लीच्या तख्तावरती ! ”

---

**शब्दार्थ** – शिंदी खजुरीचे झाड, सूर – ताडी, लोठी – उपवर वारली तरूणी,
तारपे – वारली लोकांचे एक वाद्य.

नरपड, दि. १० ऑक्टोबर १९६७

# नागवेलीचे मनोगत

( 'मातीत मिळालं मोती' या कादंबरीनंतर आमचे मित्र कवी आरेम् चा 'मळा' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यावेळी केळव्याची राणी नागवेली (पानवेल) हिला धन्यता वाटून ती बोलली असेल— )

( अध्यक्षीय भाषणातील स्वयंस्फूर्त उद्‌गार )

युगायुगाची धरती
तीत कदलीवनाची माती
या मातीत मला मिळाले एक मोती
मला मनोमन ओळखणारे
माझा साजशृंगार करणारे
या पूर्वी अनेक मळेवाले जन्मले नि मेले
परंतु—
माझे नखरेल मुरडणे
माझे सदाचे हिरवेपण
माझे कोमल नाजुकपण
कोणी कोणी जाणले नाही
फक्त माझा उपयोग—
पैसे मिळविण्यासाठी
देवापुढे ठेवण्यासाठी
लग्नात कातरलेली सुपारी
ठेवून फेकून देण्यासाठी
साधे पान खाऊन कुठेतरी

पिचकारी मारण्यासाठी
बस्स इतकेंच !
माझ्यातील मदनाची मस्ती
माझ्यातील उन्मादक काव्य
माझ्यातील इस्काचा रंगणारा
विडा रंगवणारे
या मळ्याच्या मातीतील
एक मोती मला मिळाले
मी कृतार्थ झाले !
त्याचे नाव कत्री आरेम्
धन्योऽहम् धन्योऽहम् ! !

दादर, दि. २८–९–१९८५

# तू भुताळी !

( मागासलेल्या वर्गातीलच नव्हे तर तथाकथित मध्यम वा उच्च वर्णीय स्त्रीची पण एक मनोव्यथा )

तू भुताळी भुताळी
आळ आला ग कपाळी
सासू सासरा नवरा मेली
रंगरूप वय माझी गेली
गावच्या भुक्कड भगताने ठरविली
तू भुताळी भुताळी
माझी मुलं शिकली सवरली
पण मुले त्यांना नाही झाली
झाली तर आजारी पडू लागली
शिकलेली सूनही सांगू लागली
तुझी आई भुताळी भुताळी
माझी मुले षंढ आणि निर्बुद्ध
मी झुरते जळते करू न शकते सिद्ध
की मी नाही भुताळी भुताळी
कुणी आजी आई आत्या बहीण
काकू जावू मावशी शेजारीण
यांच्या नशिबीही येते
तू भुताळी भुताळी

*   *   *

पण मीही विसरते   चुकते
आणि दुसरीला सांगते
तू भुताळी भुताळी

नरपड, दि. ७-८-८६

## आम्हाला देव का हवा ?

२५८०
काव्य २५६८९
२०८८८

कुठेतरी घडणाऱ्या घटनाशी संबंध हवा
म्हणून आम्हाला देव हवा
सज्जनाच्या सत्कार्याच्या श्रेयासाठी
दुर्जनाच्या दुष्कर्माच्या पांघरूणासाठी
निमित्त म्हणून आम्हाला देव हवा
गाडी उलटली या टक्करली
आणि माणसे चिरडली
जरी ती शिर्डीहून आली असली
बोट बुडाली आणि यात्रेकरू बुडाले
जरी ती हाजयात्रेहून आली असली
लस न टोचता पंढरपूरच्या यात्रेला जाल
तर पटकी होऊ शकेल
जरी विठ्ठल दर्शन घडले असेल
कोण मेले कोण वाचले
याचे निमित्त सांगता यावे
म्हणून आम्हाला देव हवा
कारणाशिवाय कार्य नाही
हे विज्ञान जर सत्य आहे
तर मग आम्हाला देव का हवा ?

दादर, दि. ७-८-१९८७

## हटाव – बचाव

पंतप्रधान हटाव, मुख्य मंत्री हटाव
(कुणीही आले तरी)
गरिबी हटाव अज्ञान अंधश्रद्धा हटाव
रोग हटाव प्रदूषण हटाव
पण कोणी हटत नाही
प्रत्येक बाब हटून बसली आहे
या हटावाच्या सरावामुळे
माणसातला 'माणूस' मात्र हटत चालला आहे
म्हणून हटाव हटवून
'तो' माणूस बचाव !

दादर, दि. ९-८-८७

## हवे – नको

जात नको मज धर्म नको
देव नको मज स्वर्ग नको
धनदौलत मज फार नको
सत्ता नको मज मोह नको
ग्रंथ हवे, मज प्रेम हवे
विश्वास हवा माणुसकी हवी
दीनदलितांची नित सेवा हवी
सद्सद्विवेक मज बुद्धी हवी
आणि अखेर –
सेवाभावींना मिळणाऱ्या हेवाभावींच्या
शिव्या खाण्याची मज शक्ती हवी

दादर, दि. ११-८-८७

## हे मृत्यो !

मी देवभक्त कधीच नव्हतो
पण परंपरेने देव मानला जाई
आता खूप विचारांनी मन पक्के करून
बुद्धिप्रामाण्यवादाचा वसा घेतला
बुद्धिवादीही उतारवयात देव दैव मानतात
मी उतारवयातही घेतला वसा सोडणार नाही
जन्माला आला तो मरणार आहे
मरण कुठे कसे येईल
हे कुणालाच सांगता येणार नाही
देव देव करीत मरण्यापेक्षा
दुसऱ्याला देत देत करीत
मरण्यात महानता आहे
हे मृत्यो, तू कसाही ये
मी तुझे स्वागत करतो
जीवन सुयोग्य जगल्याचे
मला समाधान आहे. !

नरपड, दि. १४-८-१९८७

## अरविन्द राऊत लिखित पुस्तके

१) यंत्रकार दादोबा ठाकूर

२) जीवन – गुंजी

३) पोटजातींच्या एकीकरणाची आवश्यकता आणि शक्यता

४) पाठारे क्षत्रिय समाजदर्शिका ( संपादन )

५) उद्योगवीर रामचंद्र हिराजी सावे ( संपादन )

६) मुंबईतील झोपडपट्टी ( नगरसेवक श्री. पुष्पकांत म्हात्रे : सत्कार्य, सेवा व सन्मान ( संपादन )

७) खजुरी ( कवितासंग्रह )

REFBK-0025681

REFBK-0025681

२५८०
काव्य २५६८१
२०।५।८८

कविवर्य केशवसुतांनी म्हटले आहे—

‘ कवी होता कसा आनना ’

यासाठी केवळ —





स्वाती प्रिंटर्स, दादर.